

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः । इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र




वर्ष ४७ वे

अंक ९ वा

१० ऑक्टोबर २०२५

किंमत १ रुपया


## सर्व सभासद, वाचक व हितचिंतकांना

## तेजोमयी दिपावलीच्या प्रकाशमयी शुभेच्छा...!

## श्री परशुराम भवन येथील अष्टमी पूजनाची क्षणचित्रे...



## भोंडल्याच्या कार्यक्रमाची क्षणचित्रे...





# श्री परशुराम भवन येथे अष्टमी पूजन उत्साहात संपन्न



दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिक तर्फे अष्टमी उत्सव, अर्थात श्री महालक्ष्मी पूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. गेली दोन वर्ष आपल्या परशुराम भवन ह्या वास्तूचे बांधकाम सुरू होते, म्हणून आपण सदर कार्यक्रम प्रसाद मंगल कार्यालय येथे करीत होतो. पण या वर्षी आपण अष्टमी उत्सव श्री परशुराम भवन येथे साजरा केला.

सकाळी १० वाजता महालक्ष्मीचे विधीवत पूजन झाले. पहिल्या मजल्यावरील लेले सभागृहात ही पूजा आयोजित करण्यात आली होती. या वर्षी पूजेसाठी १९ मुली होत्या. श्री. वैभव जोगळेकर यांनी पूजा सांगितली व त्यांच्याबरोबर विद्या दुगल व मंगला जोगळेकर यांनी मुलींना ह्या व्रताचे महत्व, शास्त्रीय माहिती दिली. श्री अन्नपूर्णा देवीची पूजा, आरती व कहाणी वाचन झाले. एक ते दीड तास सभागृह मंत्रोच्चाराने, फुलांच्या, उदबत्तीच्या सुवासाने व निरांजनाच्या ज्योतीने भरुन गेले होते. प्रसन्न वातावरणान पूजा संपन्न झाली.

या वेळी देवीच्या मागील बाजूला खऱ्या केळीच्या पानांची सजावट केली होती. त्यावर पांढरा निशिगंध व लाल अस्टर च्या फुलांचे छोटे गुच्छ होते. पिवळी, लाल काठ पदराची नऊवार साडी परिधान केलेली देवीची मूर्ती खूप सुंदर, सात्विक व प्रसन्न दिसत होती. देवीच्या रूपाला साजेसा व मूर्तीला पेलेल असा योग्य व सुंदर हार नेहमीप्रमाणे अदिती आधारकर हिने केला होता. सोन्या, मोत्यांच्या दागिन्यांनी सजलेली देवी फारच सुरेख दिसत होती. ह्या वर्षी तांदुळाच्या उकडीचा मुखवटा संध्या केळकर व त्यांची विद्यार्थिनी गार्गी नातू यांनी केला होता. दर्शनाला येणारी प्रत्येक व्यक्ती देवीच्या मुखवट्याबद्दल व सुंदर रुपाबद्दल कौतुक करत होती.

नवीन वास्तुमधे ह्या वर्षी प्रथमच हा उत्सव साजरा झाला. पण कोणत्याही बाबतीत अडचण आली नाही. सायं. ७ ते ९.३० ह्या गर्दीच्या वेळेत देखील शिस्तबध्द नियोजनामुळे सर्वांना व्यवस्थित दर्शन मिळाले.

नेहमीप्रमाणे सायंकाळी ७ वा. देवीचा मुखवटा तयार होवून श्री महालक्ष्मीची विधिवत पूजा झाली. यावेळी ऐश्वर्या साने यांनी संध्याकाळची पूजा केली. श्री. वैभव जोगळेकर यांनी पूजा सांगितली. हा कार्यक्रम दुसऱ्या मजल्यावर बापये सभागृहात होता. एक दिवस आधीच स्टेज, ओट्या भरणाऱ्या स्त्रियांची रांग, पुरुषांची रांग, देवी अंगात येणाऱ्या मैत्रिणींना घागरी फुंकण्यासाठी जागा ह्याचे पूर्ण नियोजन व तयारी करण्यात आली होती.

या वर्षी देखील 'ऑनलाईन' दर्शनाची सोय होती. संविद जोगळेकर या उपक्रमाची जबाबदारी घेतो व देवीची सेवा करतो.

संध्याकाळी पूजा झाल्यानंतर पौरिहत्य वर्गाच्या माधुरी जोशी ह्यांच्या मंडळाने (गटाने) श्री सुक्त पठण केले. नंतर १२ वाजेपर्यंत सभागृह देवीच्या गाण्यांनी, भक्तीगीतांनी, धुपाच्या वासाने, घागरी फुंकण्याच्या आवाजाने भरून गेले होते. सौ. चिन्मयी प्रथमेश मराठे यांनी भरत नाट्यम सादर करून तर श्री. जोगळेकर यांनी बासरी वादन करून देवीची सेवा केली. रात्री ११ नंतर दर्शनाची गर्दी कमी झाल्यावर अनेक मैत्रिणींनी, सामुहिक नृत्य, गोंधळ, टिपऱ्या नृत्य व जोगवा मागून अंबेचा जागर केला. '' उदे गं अंबे उदे'' !!

ह्या सर्व कार्यक्रमात जेवण, नाश्ता, दुग्धपान ह्याची व्यवस्था अगत्य केटरर्सचे निलेश गोखले व प्रियांका गोखले यांनी केली व सहकार्य केले.

असे कार्यक्रम म्हणजे,... ''जगन्नाथाचा रथ'' असतो. 'टीम वर्क' असते चित्तपावन ब्राह्मण संघाचे सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, पतसंस्थेचे कर्मचारी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

तसेच मंगला जोगळेकर, मैथिली गोखले, सुवर्णा सहस्त्रबुध्दे, गीता मराठे, हर्षदा देवधर, मीरा दामले, माधवी जोगळेकर, प्रज्ञा बापट, रश्मी दांडेकर, ऐश्वर्या साने, सायली गोखले, जान्हवी नातू, पल्लवी घारपुरे, वासंती फाळके, सुनिता परांजपे, स्मिता रानडे, अमृता वाड, माधुरी जोशी, नेहा गोखले, नेहा साने, सुप्रिया रानडे, विद्या दुगल, नूतन गोखले ह्या मैत्रिणींनी दरवर्षीप्रमाणे अष्टमी उत्सव अधिक देखणा व नियोजनबध्द करण्यास हातभार लावला.

## भोंडल्याचा कार्यक्रम उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न



दरवर्षीप्रमाणे दि. २२ सप्टेंबर रोजी ''श्री परशुराम भवन''या आपल्या नूतन वास्तूत भोंडल्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

मंगलाताई जोगळेकर यांनी प्रास्ताविक केले. त्यामध्ये त्यांनी भोंडल्यासंबंधी माहिती सांगितली, आजही आपल्याला त्याची फारशी माहिती नाही. भोंडला..अश्विन शुध्द प्रतिपदेपासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत खेळतात. नाशिक, पुणे, मुंबई भागात ''भोंडला'' तर कोकणात ''हादगा'' म्हणतात, तर विदर्भ व खान्देशात यास ''भुलाबाई'' म्हणतात. तेथे शंकर-पार्वतीच्या मातीच्या मूर्ती असतात तर ''भोंडला'' किंवा ''हादगा'' खेळतांना हत्तीची मूर्ती किंवा पाटावर रांगोळीने हत्ती काढतात. त्याची पूजा करून भोवती फेर धरून मुली गाणी म्हणतात. भोंडल्यासाठी ''हत्तीचीच प्रतिमा'' कां? तर नवरात्रात अवकाशात देवीतत्त्वाचे प्राबल्य असते. हत्ती हे देवी लक्ष्मीचे प्रतिक आहे. याच वेळेस ''हस्त'' नक्षत्राचा पाऊस पडतो. हत्ती आपल्या सोंडेतून सागरातले पाणी आणून पाऊस पाडतो, अशी आख्यायिका आहे. हा पाऊस पृथ्वीला धनधान्यांनी समृध्द करतो. भोंडल्याची गाणी सुध्दा वैशिष्ट्यपूर्ण आहेत. लहानपणीच विवाह होऊन सासरी गेलेली ''सासुरवाशिण'' आपल्या व्यथा, दु:ख गाण्यातून व्यक्त करते. त्याकाळी मैत्रिणींसमोर मन मोकळं करण्याचा तो एक सुलभ मार्ग होता म्हणा नां!

सायंकाळी ६ वा. भोंडला सुरू झाला. तीन छोट्या कुमारिकांच्या हस्ते हत्तीचे पूजन करण्यात आले. जुन्या गाण्यांबरोबरच आता बदलत्या परिस्थितीनुसार काही नवीन गाणींही म्हटली. काही मैत्रिणींनी आणलेली खिरापत व संस्थेची खिरापत ओळखतांना खूप मजा आली. परत एकदा सगळ्यांनी बालपण अनुभवले. या कार्यक्रमासाठी ५०/५५ मैत्रिणी उपस्थित होत्या.

***

## श्री.अजित कुंटे यांची श्री परशुराम भवन प्रकल्पासाठी रु. पाच लाखांची देणगी



श्री.अजित रामचंद्र कुंटे (बेंगळुरू) यांनी त्यांच्या मातोश्री कै. मालती रामचंद्र कुंटे व पिताश्री कै. रामचंद्र गोपाळ कुंटे (कुंटे सर, नाशिक) यांच्या स्मरणार्थ संस्थेस रू. ५ लाखांची देणगी दिली आहे. कार्यकारिणी सदस्य श्री. हेमंत वाड यांनी त्यांना श्री परशुराम भवन भेटीचे निमंत्रण दिल्यानंतर त्यांनी भवनाला भेट देऊन आनंद व्यक्त केला व ही देणगी दिली. या वेळी अध्यक्ष श्री. विजय साने देखील उपस्थित होते. त्यांनी श्री. कुंटे यांना पुढील प्रकल्पांविषयी माहिती दिली व श्री. अजित कुंटे यांनी पुढील प्रकल्पासाठी देखील देणगी देण्याचा मानस व्यक्त केला. श्री. अजित कुंटे यांचे संस्थेच्या वतीने मन:पूर्वक आभार.

***

### ✻ संस्थेचा मोबाईल नंबर ✻

**नमस्कार, चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिकचा अधिकृत मोबाईल नंबर +91 832 989 6878 हा आहे. कृपया सर्व सभासदांनी हा नंबर Nasik Chitpavan नावाने save करावा, जेणेकरून इथून पुढील सर्व मेसेजेस आपल्याला मिळणे सोपे होईल.**

# दिवाळी मनाची...

माणसाला कायम नित्यनवे काहीतरी करायची इच्छा असते. जगण्यात तोचतोचपणा आला, की सगळंच  नीरस, बेचव वाटायला लागतं.. किंबहुना हाच नाविन्याचा धागा पकडून आपल्या पूर्वजांनी सण साजरे करायची प्रथा पाडली असावी. कोणताही सण म्हटला की घरात पाहुणे–रावळे आले, त्यांची सरबराई आली. घरादाराची साफसफाई आली.. त्यायोगे कपड्यात, घरात आणि एकंदर आयुष्यात नाविन्यही आलंच.. त्यात दिवाळी हा तर सणांचा राजा.. काय त्याचा थाट, काय तो गाजावाजा.. फळांच्या राजासारखंच या सणांच्या राजाचंही असतं – तो यायला एक ठराविक 'सिझन' असतो, त्याचा ठराविक कालावधी असतो, त्याला आपलं असं खास चव – रंग – रूप असतं आणि त्याला राजासारखंच वागवलं देखील जातं..



दिवाळी म्हटलं, की डोळ्यासमोर येते ती दारापुढली रांगोळी, तिच्याभोवती (आणि तुळशीजवळ) मांडलेल्या पणत्या, आकाशकंदील, फटाक्यांची आतषबाजी, नवे कपडे, तेल–उटण्यानं केलेलं अभ्यंगस्नान, सकाळी देवळात जाऊन प्रसन्न मनाने घेतलेलं देवाचं दर्शन आणि त्यानंतर भावंडांसोबत केलेली मजा–मस्ती, मित्रांसोबत एकमेकांच्या घरी जाऊन त्यांना शुभेच्छा देणं, तिथल्या थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेणं, सगळ्यांनी मिळून खाल्लेला सगळ्यांच्या घरचा फराळ (ज्याच्या चवीतच आपसातलं सगळं वाईट–साईट विरघळून गेलेलं!), दुपारी गोडाधोडाचं जेवण, त्यानंतरची थोडीशी झोप, संध्याकाळी नवीन कपडे घालून बाहेर (गावात) मारलेला फेरफटका, रात्रीच्या जेवणानंतर घरातल्या लहान मुलांसोबत उडवलेले फटाके.. एकूणच सगळी मज्जाच मज्जा.. आठवणींचा भलाथोरला खजिनाच हा...!

दिवाळी जशी घराची, नात्यांची, तशीच किंबहुना त्याहून अधिक ती मनाची असते! मन कायम ताजं प्रफुल्लित ठेवायला दिवाळीसारखा सण आणि त्याच्या आठवणींसारखी दुसरी गोष्ट नाही! दर वर्षी दिवाळीला ही मजा आठवतेच आणि त्या आठवणींनंतर ओठांवर आपसूकच खुदकन आलेलं हसू लपवताही येत नाही! खरंतर या आठवणींनीच मन आणि जीवन दोन्ही समृद्ध होत असतं..

**– श्री. मकरंद फडके**




PV पराग वैशंपायन
फोटोग्राफर
क्षणांचे सौंदर्य कॅमेऱ्यातून टिपतो..
आनंदी क्षणांच्या आठवणी आपुलकीने जपतो..
* साखरपुडा फोटोग्राफी/व्हिडिओ
* प्रिवेडिंग फोटोशूट/व्हिडिओ
* ट्रेडिशनल वेडिंग फोटोग्राफी
* वेडिंग कँडिड फोटोग्राफी
* वेडिंग ट्रेडिशनल व्हिडिओ
* सिनेमॅटिक वेडिंग व्हिडिओ
* बेबीशॉवर शूट
आधुनिक उपकरणांसह तरबेज टीम
ऑफीस : प्रभूशिल्प अपार्टमेंट, तपोवन रोड, नाशिक
9225762400 / 9405360834

## रौप्यमहोत्सवी अष्टमी पूजनात नाशिक रोड ला महालक्ष्मीचा उत्साहात जागर



चित्तपावन ब्राह्मण संघाच्या नाशिक रोड शाखेतर्फे सोमवारी सायंकाळी अष्टमी पूजन करण्यात आले. या उपक्रमाचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष होते. महालक्ष्मीचा तांदुळाच्या उकडीचा सुरेख मुखवटा करून सुंदर प्रतिमा साकारण्यात आली. यावेळी ६ नवविवाहित सुवासिनींनी पूजाअर्चा, आराधना केली.

उपस्थित भाविकांनी महालक्ष्मीचा जयजयकार करीत उत्साहात जागर केला. काल मंगळवारी सकाळी उत्तरपूजेनंतर विधीपूर्वक विसर्जन करण्यात आले. नाशिकरोड येथील ताराराणी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. महालक्ष्मीचा सुरेख मुखवटा कला शिक्षक सुधीर फडके व चित्तपावन ब्राह्मण संघाचे पदाधिकारी सुशील सहस्रबुद्धे यांनी तयार केला. श्री सुक्त पठण करण्यात आले.

त्यामध्ये मीना गोवंडे, शिल्पा मेहेंदळे, अर्चना सहस्रबुद्धे, वीणा दांडेकर, सौ. रोहिणी सहस्रबुद्धे, निशा गोवंडे या सहभागी झाल्या. श्री. व सौ. सुनील दामले यांच्या हस्ते आरती करण्यात आली. विशेष म्हणजे अरूणा ओक, माधवी भाभे या महिलांनी पौरोहित्य केले. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी भास्कर मेहेंदळे, प्रकाश मेहेंदळे, प्रशांत देवधर, सुयश आठवले, समीर गोवंडे, सुशील सहस्रबुद्धे, उदय गाडगीळ, जयंत भावे व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**– प्रकाश मेहेंदळे, नाशिक रोड**

## श्रीमती अनुराधा माधव नामजोशी यांना मानाचा शिक्षक गौरव पुरस्कार प्रदान.



श्रीमती अनुराधा माधव नामजोशी भोसला मिलिटरीच्या 'बालक मंदिर' येथे १९९५ पासून कार्यरत होत्या व २०२० साली त्या सेवानिवृत्त झाल्या.

सेवानिवृत्तीनंतर पाच वर्षांनी नाशिकचे वैभव मानले जाणारे 'ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य कुसुमाग्रज' यांच्या प्रेरणेने, १९७० पासून सुरू केलेला 'शिक्षक गौरव पुरस्कार' सार्वजनिक वाचनालयाने आणि नागरिक शिक्षक गौरव समितीने, ज्ञानदानाच्या उदात्त आणि गौरवास्पद कार्याबद्दल, सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी उद्योग व मराठी भाषा मंत्री मा. ना. श्री. उदयजी सामंत यांच्या शुभ हस्ते त्यांना प्रदान करण्यात आला. यात आणखी दुग्ध शर्करा योग म्हणजे पुणे येथील मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतही त्यांच्या 'मातृभाषा अभिजात लोकप्रिय' या निबंधाला पारितोषिक जाहीर झाले होते.

पारितोषिक वितरण कार्यक्रम त्याच दिवशी पुण्यामध्ये होता, अशी माहिती त्यांचे चिरंजीव श्री. मयुरेश नामजोशी यांनी संस्थेस दिली. श्रीमती नामजोशी यांना २०१३–१४ सालचा नाशिक महानगरपालिकेचा आदर्श शिक्षिकेचा पुरस्कार देखील मिळाला आहे. शिक्षक गौरव पुरस्काराबद्दल श्रीमती अनुराधा नामजोशी यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन.


### आपल्या मासिकात जाहिरात द्या...!

आपले चित्तपावन मित्र मासिक सुमारे २२०० सभासद आणि कुटुंबियांपर्यंत प्रत्यक्ष आणि सुमारे ५०० सभासदांना ईमेल वर पोहोचते. आपल्या व्यवसाय/आस्थापनांची जाहिरात अंकात द्या. त्या मार्गाने संस्थेला आर्थिक सहाय्य देखील होईल.

जाहिरात दर खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| **रंगीत पूर्ण पान** | **रु. ३०००** | **रंगीत अर्धे पान** | **रु. २५००** |
| **कृष्ण धवल पूर्ण पान** | **रु. २०००** | **कृष्ण धवल अर्धे पान** | **रु. १५००** |
| **कृष्ण धवल पाव पान** | **रु. ७५०** | **(वर्षभराचे आगाऊ शुल्क भरल्यास १ महिना अधिक प्रसिद्धी).** | |

**जाहिरातीसाठी संपर्क : संस्थेचे कार्यालय – ०२५३–२५७६२४१**

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# इमारत निधी सप्टेंबर २०२५ - देणगीदार

कै. र. के. पटवर्धन स्मृती श्री परशुराम भवन प्रकल्पासाठी सप्टेंबर २०२५ मध्ये जमा झालेल्या देणग्या

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री. अजित रामचंद्र कुंटे | ५,००,०००/- |
| ०२ | श्री. सुभाष कृष्णराव लोंढे (कै.कालिंदी माधव चितळे व कै. माधव केशव चितळे यांच्या स्मरणार्थ) | ५१,०००/- |
| ०३ | श्री.गिरीश श्रीकांत सिधये | २,०००/- |

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# अंजनेरी वृद्धाश्रम निधी सप्टेंबर २०२५ - देणगीदार

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री. मुरलीधर सदाशिव नामजोशी (कै. श्रीकृष्ण सदाशिव नामजोशी यांच्या स्मरणार्थ) | १०,०००/- |

# अष्टमी पूजन २०२५ देणगीदार

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री. शशिकांत वामन गोखले | १२,७५०/- |
| ०२ | सौ. राधिका शशिकांत गोखले | १२,७५०/- |
| ०३ | श्री. राजीव वसंत चाफेकर | १२,७५०/- |
| ०४ | सौ. मेधा राजीव चाफेकर | १२,७५०/- |
| ०५ | श्री. दिनकर भालचंद्र साठ्ये | ११,००१/- |
| ०६ | श्री. मिलिंद साठ्ये | ५,०००/- |
| ०७ | श्री. विश्राम दीक्षित | २,५०१/- |
| ०८ | श्री. अविनाश वासुदेव म्हसकर | १,००१/- |
| ०९ | श्री. आनंद सुभाष केळकर | १,००१/- |
| १० | श्री. आनंद आठवले | १,०००/- |
| ११ | सौ. संध्या केळकर | १,०००/- |
| १२ | सौ. मेधाली विनोद जोशी | १,०००/- |

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| १३ | श्री. आनंद चंद्रशेखर साठे | ५०१/- |
| १४ | श्री. आनंद अभ्यंकर | ५०१/- |
| १५ | सौ. धनश्री आदित्य वर्तक | ५०१/- |
| १६ | श्री. पंकज साठ्ये | ५०१/- |
| १७ | सौ. अनिता राजेश रहाळकर | ५०१/- |
| १८ | सौ. मीरा भूपेंद्र वैद्य | ५०१/- |
| १९ | श्रीमती दिपा विनोद भागवत | ५००/- |
| २० | श्री. प्रसन्न शिवप्रसाद पंडित | ५००/- |
| २१ | श्री. चेतन दिलीप गोखले | १५०/- |
| २२ | श्री. आराध्य प्रथमेश गांगल | १००/- |
| २३ | सौ. साधना अविनाश गाडगीळ | १००/- |

# व्हिसा धोरणातील बदल - भारतीय विद्यार्थ्यांच्या 'अमेरिकन ड्रीम'ला धक्का?

**H-1B व्हिसा धोरणातील बदल** - भारतीय विद्यार्थ्यांच्या 'अमेरिकन ड्रीम'ला धक्का? मेहनत, कौशल्य आणि आत्मविश्वास या त्रिसूत्रीची शिदोरी बांधून, 'आपलं आयुष्य आपणच घडवू' या निश्चयाने दरवर्षी हजारो युवक-युवती अमेरिकेचा मार्ग धरतात. एकट्या भारतातूनच दरवर्षी दोन लाखांहून अधिक विद्यार्थी अमेरिकेला जातात.

काहींच्या हातात स्कॉलरशिप असते, तर बहुतेकांच्या खांद्यावर शैक्षणिक कर्जाचा डोंगर. पण प्रत्येकाच्या डोळ्यात चमक आणि मनात एकच विश्वास असतो – ''तिथे गेलो की जग बदलेल, आयुष्य उज्वल होईल ! आणि आत्तापर्यंत हे स्वप्न खरंही होत असे. गेल्या अनेक दशकांपासून "America - Land of Dreams' ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजली आहे. ही भावना केवळ विद्यार्थीच नाही, तर त्यांच्या संपूर्ण कुटुंबाच्या अपेक्षांनी, त्यागांनी आणि कष्टांनी विणलेली असते. एकदा उच्च शिक्षण पूर्ण केले आणि O.P.T. (Optional Practical Training) करून H-1B व्हिसा मिळाला की अमेरिकेत राहण्याचा मार्ग थोडा सुकर होत असे आणि केलेल्या कष्टांचे चीज नजरेच्या टप्प्यात येत असे.

**१९ सप्टेंबर २०२५ चा महत्त्वपूर्ण बदल-**

पण १९ सप्टेंबर २०२५ रोजी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी H-1B व्हिसासंबंधी एक महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आणि संपूर्ण जगात खळबळ माजली. विद्यार्थ्यांमध्ये भीती आणि निराशेचे सावट पसरले.

या निर्णयानुसार :

- ''H-1B अर्जासाठी पूर्वीची ३००० - ५००० डॉलरची फी एकदम १००,००० डॉलर (सुमारे ८८ लाख रुपये) करण्यात आली.''
- ही रक्कम एकवेळची (one-time) आणि परत न मिळणारी (non-refundable) आहे.''
- यामुळे लहान कंपन्या आणि स्टार्टअप्स आता विद्यार्थ्यांना स्पॉन्सर करण्यास तयार होणार नाहीत.''
- जे अर्जदार किंवा नियोक्ते ही फी भरू शकणार नाहीत, त्यांना अमेरिकेत प्रवेश नाकारला जाईल.

**H-1B व्हिसा म्हणजे नेमके काय?**

H-1B हा Specialty Occupation Work Visa आहे. Specialty Occupation म्हणजे अशी नोकरी जी करण्यासाठी विशेष कौशल्य, संबंधित ज्ञान किंवा उच्च शैक्षणिक पात्रता (Master's/PhD) असावी लागते.

या व्हिसाचा कालावधी ३+३ अशी एकूण ६ वर्षे होता. म्हणजेच शिक्षण संपवून नोकरीला लागून पुढील प्रगती पण करता येत असे. एकदा विद्यार्थी कमवायला लागला की भारतात घेतलेले शैक्षणिक कर्ज फेडता येत असे आणि डॉलर ते रुपयाच्या कन्व्हर्जनमुळे हे कर्ज सहज फिटत असे. त्यामुळेच भारतीय बँका आणि इतर आर्थिक संस्था अमेरिकेतल्या विद्यापीठाचे ऑफर लेटर असेल तर विनासायास कर्ज देत असत.

पण आता H-1B व्हिसाच्या वाढीव शुल्कामुळे विद्यार्थ्यांना नोकरी मिळणे अतिशय अवघड होणार हे निश्चित.

अमेरिकेत फेसबुक, गुगल सारख्या प्रचंड मोठ्या कंपन्यांमध्ये हजारो विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळत असत. पण त्याच बरोबर तेथे अनेक लहान मोठे स्टार्टअप्स देखील आहेत जेथे विद्यार्थी आपले शिक्षण आणि कौशल्य आजमावू शकत असत. आता सामान्य किंवा लो-पेइंग जॉब्ससाठी प्रायोजक मिळणे कठीण होणार आहे. उदाहरणार्थ, IT सपोर्ट, QA, बिझनेस ॲनालिस्ट अशा भूमिकांसाठी आता कंपन्या एवढा खर्च करणार नाहीत. पण उच्च कौशल्य, जसे AI, Robotics, Cyber Security, Semi - Conductor Design, Advanced Thermodynamics सारख्या क्षेत्रांतील विद्यार्थ्यांना अजूनही संधी मिळेल.

या क्षेत्रांमध्ये उच्च शिक्षित मुलांची आवश्यकता असल्याने नोकऱ्या मिळू शकतील. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांनी आता हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, केवळ मास्टर्स करणे पुरेसे नाही. तर योग्य क्षेत्र, योग्य कंपनी, योग्य अर्ज धोरण देखील महत्वाचे ठरेल. नोकरीचा अर्ज करणाऱ्या व्यक्तीवर आम्ही एक लाख डॉलर्स का इन्व्हेस्ट करावेत हा विचार प्रायोजक कंपन्या निश्चितच करतील. त्यामुळे आता केवळ पात्रता मिळवून चालणार नाही तर तुम्ही तुमच्या स्पॉन्सरसाठी तुम्ही Irreplaceable म्हणजे अपरिहार्य असायला हवे. आत्ता पर्यंत तुम्ही मेहनत केली की यश संपादन करता येत असे. आता मात्र तुम्ही तुमच्या क्षेत्रात टॉप १० ते २० टक्क्यांमध्ये असाल तरच तुम्हाला अमेरिकेत नोकरी मिळवणे शक्य

होणार आहे. तसेच पूर्वीची व्हिसा निर्णय प्रक्रिया थोडी लवचिक होती. आता कसून तांत्रिक तपासणी आणि अतिरिक्त डॉक्युमेन्ट पुरवावे लागणार आहेत. अमेरिकन स्वप्नपूर्तीसाठी आता केवळ मेहनत नाही तर अचूक रणनीती, योग्य नेटवर्किंग आणि वैकल्पिक मार्ग शोधणे आवश्यक ठरेल.

पण असे असूनही अमेरिकेत जाणे अवघड झाले असले तरी अशक्य नाही. अमेरिकेत जायचेच असेल तर इतर मार्गांचा विचार करता येईल,

जसे –

- L-1 Visa (Intra Company Transfer): भारतातील MNC मध्ये काम करून त्याच कंपनीच्या अमेरिकन शाखेत ट्रान्सफर होणे.
- O-1 Visa (Extraordinary Talent): संशोधन, पेटंट, विशेष प्रोजेक्ट्स केलेल्यांसाठी.
- EB-2 NIW (National Interest Waiver): स्वतःचा अर्ज करून ग्रीन कार्ड मिळवण्याचा मार्ग.
- कॅनडा/UK द्वारे USA मध्ये प्रवेश : आधी कॅनडा/UK मध्ये जाऊन नंतर अमेरिका ट्रान्सफर.H-1B व्हिसामधील बदल भारतीय विद्यार्थ्यांसाठी मोठा आव्हान निर्माण करत आहेत. परंतु स्वप्न पूर्ण होणे अजूनही शक्य आहे. फक्त आता :
- मेहनत + कौशल्य + आत्मविश्वास पुरेसे नाही, तर –
- स्ट्रॅटेजी + धाडस + योग्य निर्णय घेणे अनिवार्य आहे.

विद्यार्थ्यांनो, तुमच्या अमेरिकन ड्रीमसाठी सज्ज व्हा! योग्य नियोजन, कौशल्य विकास आणि वैकल्पिक मार्गांचा विचार करून तुम्ही बदलत्या नियमांमध्येही स्वतःचे भविष्य उज्वल करू शकता. जो विद्यार्थी फक्त स्वप्न पाहून थांबत नाही तर त्यासाठी पावले उचलतो, योग्य दिशा शोधतो आणि आव्हानांना सामोरे जातो, त्याचे भविष्य निश्चितच उज्वल आहे. पुढील लेखात आपण अमेरिकेबरोबरच इतर देशांमधील पर्याय, तेथील उच्च शिक्षण आणि नोकरीच्या संधी यांचा सविस्तर आढावा घेणार आहोत, जेणेकरून तुमच्या स्वप्नांना अधिक व्यापक आणि व्यवहार्य दिशा देता येईल.

**– यास्मिन दांडेकर**

ATT Overseas Education Advisors


ATT OVERSEAS Education Advisors

# ATT OVERSEAS
# Education Advisors

Training for

IELTS | SAT | PTE | GRE

Assistance in

University & Program Selection | Admission Process | Visa & Interview

USP
- Limited batch size
- Flexible timings
- Interactive learning environment
- Personal attention



Director
**Yasmin Dandekar**

70302 36222 attnsk20@gmail.com

4, Alap Apartments, above Chai Ketli Cafe, D'Souza Colony, off College Road, Nashik



## अभिनंदनीय...

आपले सभासद श्री. मुरलीधर नामजोशी यांची नात चि. सानिका अमित पंडित हिने Institute of company secretaries of India (ICSI) तर्फे घेण्यात येणाऱ्या CS professional या परीक्षेत यश मिळवले.

तसेच पुणे विद्यापीठाच्या L.L.B. परीक्षेतही यश मिळवले. तिला संस्थेच्या वतीने पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वर यादी

| नाव पत्ता व फोन | जन्म तारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कु. मंदार बाळकृष्ण परांजपे**<br>परांजपे वाडा, मालेगाव रोड, रेल्वे स्टेशनजवळ, चाळीसगाव, जि.जळगाव.<br>**मोबा.:** ९७३०४३८८७८ | १७/०६/१९९१ | विष्णुवृद्ध | ५.९'' | बी.ई. मॅकेनिकल | ४०,०००/- |
| **कु. नितीश संजय साठे**<br>ए-२०६, आकार को.ऑप.हौ.सोसायटी, गंधर्व नगरी, नाशिक रोड - ४२२१०१<br>**मोबा.:** ९४२१५७०५२० | ११/०३/१९९६ | वशिष्ठ | ५.१०'' | एम.कॉम. सीए (इंटर) | ४०,०००/- |



## भावपुर्ण श्रद्धांजली...

आपल्या संस्थेचे सभासद श्री. मुरलीधर सदाशिव नामजोशी यांच्या पत्नी सौ. सविता मुरलीधर नामजोशी यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी दि. २७/०४/२०२५ रोजी दु:खद निधन झाले.

त्या नाशिक एच.ए.एल. च्या निवृत्त कर्मचारी होत्या संस्थेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.



**चतुः शाखीय ब्रह्मवृंद गायरान ट्रस्ट आणि संस्कृत भारती नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने**

## ५ ते १२ वयोगटातील मुलां-मुलींसाठी साप्ताहिक संस्कृत बालकेंद्र

**वेळ : दर रविवारी - दुपारी ५ ते ६** | **ठिकाण : गोपाल मंगल कार्यालय, सरदार चौक, पंचवटी, नाशिक**

लहान मुलांमध्ये बालपणापासूनच आपली संस्कृती व भाषा याविषयी प्रेम निर्माण व्हावे व सामाजिक व राष्ट्रीय जडणघडणीत आपल्या जबाबदारीची जाणीव निर्माण होईल, या दृष्टिकोनातून या बाल शिबिरात शिक्षण दिले जाणार आहे.


**विविध खेळ, पाढे, विनोद, गमती जमती, यासह संस्कृत श्लोक, प्रार्थना हे सर्व काही शिकवले जाणार आहे. संस्कृत भारतीच्या कार्यकर्त्या व शिक्षिका आर्या नरेश पुजारी आणि सहकारी या वर्गाचे संचलन करणार आहेत.**

तरी या बाल संस्कृत केंद्रामध्ये आपल्या मुला-मुलींनी उपस्थित राहावे. तसेच पालकांनी संबंधित मुला-मुलींच्या पालकांपर्यंत हा विषय पोहोचवावा असे आवाहन गायरान ट्रस्ट या संस्थेचे अध्यक्ष श्री. मोहनजी रानडे, खजिनदार श्री. प्रमोद गर्गे, कार्यवाह अभय कुलकर्णी संस्कृत भारतीच्या प्रांत अधिकारी सौ. संगीता आंभोरे आणि बाल केंद्र प्रमुख आशा शिंदे यांनी केले आहे.


...आम्ही फक्त सोनं विकत घेतो
संपर्क: पवित्र टकले
९८२२०५७०००
तुमच्या जुन्या सोन्याला सर्वोत्तम दर
टकले
ओल्ड गोल्ड
६०१, ६वा मजला, सिद्धी पूजा बिजीनेस स्क्वेअर, लेले हॉस्पिटल मागे, कुलकर्णी गार्डन जवळ, शरणपुर रोड, नाशिक - ४२२००२

## "नाशिकरोड शाखा - अष्टमी पूजन"




**आपल्या मासिकात जाहिरात द्या...!** – आपले चित्तपावन मित्र मासिक सुमारे २२०० सभासद आणि कुटुंबियांपर्यंत प्रत्यक्ष आणि सुमारे ५०० सभासदांना ईमेल वर पोहोचते. आपल्या व्यवसाय/आस्थापनांची जाहिरात अंकात द्या. त्या मार्गाने संस्थेला आर्थिक सहाय्य देखील होईल. जाहिरात दर पुढीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| रंगीत पूर्ण पान | रु. ३००० | रंगीत अर्धे पान | रु. २५०० |
| कृष्ण धवल पूर्ण पान | रु. २००० | कृष्ण धवल अर्धे पान | रु. १५०० |
| कृष्ण धवल पाव पान | रु. ७५० | (वर्षभराचे आगाऊ शुल्क भरल्यास १ महिना अधिक प्रसिद्धी). | |

जाहिरातीसाठी संपर्क :
संस्थेचे कार्यालय
०२५३-२५७६२४१



चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, एस.बी.आय.बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**


प्रति, ______________________

______________________

______________________


**संस्थेची वेबसाईट :-**

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan



या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.



RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.